Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE:EPABX–2609000, www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
संलग्नता/टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/कार्यशाळा/कोल्हापूर/२०२५-२६/ No 8 9 0 दि. 10 FEB 2026

प्रति,
मा.प्राचार्य /संचालक,
कोल्हापुर शहर व जिल्हातील विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये / संस्था.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संलग्न महाविद्यालयांकडून नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार इ. प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने ICT च्या माध्यमांच्या अनुषंगाने प्रपत्र 'अ','ब' व विद्याशाखानिहाय 'क'अहवालाच्या नमुन्यांबाबत महाविद्यालय स्तरावरील प्राचार्य / शिक्षक अथवा संबधित प्रशासकीय कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याबाबत..

महोदय / महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संलग्न महाविद्यालयांकडून नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार इ. प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने ICT च्या माध्यमांच्या अनुषंगाने प्रपत्र 'अ', 'ब' व विद्याशाखानिहाय 'क' अहवालाच्या नमुन्यांबाबत महाविद्यालय स्तरावरील प्राचार्य / शिक्षक व संबधित एक प्रशासकीय कर्मचारी यांचे प्रशिक्षण देण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्याकरीता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्हा | कार्यशाळेचा दिनांक | उपस्थितीबाबत महाविद्यालयीन तपशील | कार्यशाळेचे नियोजित स्थळ | कार्यशाळेची वेळ | नियोजित विद्याशाखा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | दि.१३ फेब्रुवारी २०२६ | शै.वर्ष २०२६-२७ साठीचे महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांचे नुतनीकरण,नैसर्गिक विस्तार यांचे ऑनलाईन कामकाजाचे प्रशिक्षण घेणेसाठी प्राचार्य / शिक्षक व संबधित एक प्रशासकीय कर्मचारी | डी. आर.माने महाविद्यालय, कागल ता.कागल, जि.कोल्हापूर | १०.३० ते ०१.०० | कला,वाणिज्य व विज्ञान विद्याशाखा |
| | | | | | ०१.०० ते १.३० | चहापान वेळ |
| | | | | | १.३० ते ३.३० | विधी, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व BBA,BCA & MBA,MCA व्यवसायिक विद्याशाखा |

विद्यापीठामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संलग्न महाविद्यालयांकडून नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार इ.प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने ICT च्या माध्यमांच्या अनुषंगाने प्रपत्र 'अ','ब' व विद्याशाखानिहाय 'क' अहवालाच्या नमुन्यांबाबत माहिती करुन देण्याकरीता पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालयांमधून प्राचार्य / शिक्षक व एक शिक्षकेत्तर कर्मचारी ( महाविद्यालयातील सदरचे कामकाज पाहणारे ) यांनी उपस्थित रहावयाचे असुन त्यांना कोणत्याही प्रकारचा भत्ता देय असणार नाही.

सबब, उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये / संस्था यांचे प्राचार्य / संचालक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की,संबंधित कार्यशाळेकरीता आपल्या महाविद्यालयाचे उपरोक्त नमूद केल्यानुसार प्राचार्य / शिक्षक व संबंधित महाविद्यालयातील सदरचे कामकाज पाहणारे एक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नियोजित वेळेच्या पंधरा मिनिटे अगोदर स्वत:उपस्थित राहावे,ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

डॉ.पी.एस.पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

टिप - विद्यापीठ संलग्नीत पारंपारीक महाविद्यालयामध्ये पदवी स्तरावरील बीबीए व बीसीए तसेच पदव्युत्तर स्तरावरील एमबीए व एमसीए हे अभ्यासक्रम सुरु आहेत. अशा महाविद्यालयातील प्राचार्य/शिक्षक व संबंधित महाविद्यालयातील सदरचे कामकाज पाहणारे एक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी दुपारच्या सत्रामध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे.